**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८६ वे) प्रभुतरुण मुंबई, मंगळवार, ता. १६ माहे ऑगस्ट, सन २०११ (अंक ९८५**


*संपादकीय*

## श्रावण मनभावन....

**-सुहासिनी कीर्तिकर**

गेल्या अंकात माझ्या अग्रलेखातून पाऊस बरसला होता. ‘आला आषाढ श्रावण, आल्या पावसाच्या सरी. किती चातकचोचींनी प्यावा वर्षा ऋतु तरी’ अशी असोशी तेथे होती. त्यात आषाढाबरोबर श्रावणही होता. श्रावण म्हणजे आपल्या पंचांगातला पूर्णपणे आनंदाचा महिना. ‘फेस्टिवल फीस्ट’! अगदी ‘गटारी’ ओलांडून श्रावणात पहिलं पाऊल टाकलं की सुरु होतो ‘आनंदी आनंद गडे!’

पावसानं निसर्गाची कात टाकलेली असते. हिरवाई ऊतू चाललेली. वर मेघडंबरी छायाप्रकाशाचे रंग घेऊन ओथंबून आलेली. सणांची तर रेलचेल. नागपंचमी, जन्माष्टमी, गोकुळाष्टमी, नारळीपुनव तर सगळीभर साजरी होते. पण परभांमध्ये श्रावणी सोमवार, शनिवारही भाव खाऊन असतात. आता दिवेलगण होता होता श्रावणी सोमवारचा उपास सुटत नाही. माणसंच चाकाचक्रावरून घड्याळ्याच्या चक्राला मागं टाकत केव्हातरी घरी उजाडतात. पण तरीही त्यानंतर आंघोळ, पूजा, नैवेद्य असले सोपस्कार होत केळीच्या पानावर सुबक सजलेलं जेवण सोमवारला ‘शिव’ सुंदर रूप देतं. पातवड, पोळ्या, कौला यांनी श्रावणाची चवच बदलून जाते. या कौल्याच्या सांबाऱ्यावरून आठवलं. काही म्हणी, वाक्प्रचार अस्सल देशी वाणाचे असतात. प्रमाणभाषेत त्याला मान्यता असतेच असं नाही. या देशी वादासाठी हिरीरीनं झगडावं अशा वयात मी नसतानाची गोष्ट. म्हणजे शाळकरी पाचवी सहावीतलं वय होतं. शाळेत काही म्हणी अन् वाक्प्रचारांविषयी लिहितांना मी घरी ऐकीवात असलेलं आपलं लिहून टाकलं. ‘ताटात कौला, महादेव जेवला.’ आमच्या सरांनी त्यावर चांगली लालभडक फुली मारली! ते वय फुल्या फुल्या मारून वाक्य पूर्ण करण्याचंही नव्हतं! मी मुकाट राहिले. श्रावणाची ही अशीही वेडी आठवण. मोठी असते तर बोलीभाषा, संस्कृती, पर्यावरण असं काय न् काय; ऐकवलं असतं मी. असो. श्रावणी सोमवार असा आठवड्याची चवदार सुरुवात करून देई. जेवताना मौन पाळून केलेला तो सोमवार आज मौन सोडून बरंच काही सांगतो आहे ना? श्रावणी शनिवारही परभांच्या घरी तऱ्हतऱ्हेच्या खिचडींचे वास उधळत येतो. वाटाण्याची, मक्याची, काजूची, चवळीची....दर शनवारी वेगळी! बरोबर माठाची भाजी, कोवळ, वडे चटणी, उंबर....सगळं कसं साग्रसंगीत. जन्माष्टमीला केळ्याच्या पोळ्या कराव्यात परभांनीच. (आता राजेळी तशी शोधावी लागतात!) श्रावण पोर्णिमा जशी महत्त्वाची तशी श्रावण अमावस्याही. अनार्यात असणारी

(पान २ कॉलम १ वर)

## पुण्यस्मरण



**श्री. सुहास कोठारे**

*विस्तारीत संपादकीय*

## Tick-Tock

**-Vaijayanti Kirtikar**

Alas! Life for me is nothing but a routine. Sadly, the clock on the wall never seems to realize that it has been a long night, with a late movie and then some more time chatting online with friends. Beep-Beep-Beep…the alarm on the mobile keeps ringing endlessly. Time for the mad-rush to begin…to achieve the first uphill task for the day – to reach office on time.

**Dear Time,**

I have always respected you and cherished every second of you. I have always asked for more of you every single time I was preparing for an examination, writing an exam, preparing reports to be submitted to the Hari-Sadu boss and for every other important event in my life. Infact, I pray for more of you every single night before I sleep and every single morning when the alarm starts ringing annoyingly.

Despite worshipping you so much, why are you still at war with me? Or do you enjoy teasing me all the time?

When I ask for more of you, you happily tick away as if it is you who has to board the 8:00 am fast local to work instead of poor me who has to accept your challenge head-on every morning and put on my best sprinting skills on display to actually board the train and reach office on time. Do you even have an idea how painful it is to win the challenge in stilettos? Winning has never been more painful.

And then there are times when I ask for less of you! I keep staring at you, moving at snail pace in my watch, with the second hand crawling like the pot-holed Mumbai traffic. I will you to move faster. I dare you to move at the jet speed you boast about every morning. But you enjoy this game, don't you? You don't pay heed to my challenge; you enjoy your sweet afternoon slumber, followed by tea and snacks, and only then you declare it as the official time to leave office and go home.

But the gravest and most unforgivable of my allegations against you is that you are a murderer. Over time you have killed my memory, my hair, my sprinting skills, my favourite music in college, Giant Robot, Chitrahaar, I Love Lucy, so many relationships and of course my pair of most expensive jeans I have ever bought.

And still you go scot free. You are not judged guilty in any court of law, so does that

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

सप्तमातृकांची पूजा परभांनी महत्त्वाची कशी मानली; हा कदाचित संशोधनाचाच विषय असेल. पण सगळ्या मराठी मनांत तो 'मातृदिन' असतोच. कृषिवलांसाठी पोळा! एक मात्र खरं की श्रावणात अवघ्या निसर्गालाच महत्त्व असतं. फळे,फुले ढिगाऱ्यांनी,राशीवारी असतातच. पण त्यांच्या सोबतीनं पत्रीही असते. मंगळागौर,पिठोरी या पूजनात पत्री हवीच. या ऋतूत हिरवाई अधिक जोमानं बहरण्यासाठी पत्री खुडणे गरजेचेच असणार. 'की तोडिता तरू फुटे आणखी भराने' हेच खरं ना? मग पूजोपचारात मांगल्य,समृद्धीचं रूप म्हणून फळाफुलांबरोबर पत्रीही आली. फुलांना हलकेपणाने अंगावर वागवीत ही पत्री जेव्हा बाजवटावर विराजमान होते तेव्हाची सौंदर्याकृती डोळ्यांना सुखच सुख देते. हे चित्र मग डोळ्यांतून मनात उतरते. समाधान पावते. श्रावण अधिक चित्रमयी बनतो. याच श्रावणात इतरही सण भाऊगर्दी करतात बरं का!

पंधरा ऑगस्ट हा राष्ट्रीय सण श्रावणातच येतो. पारशांची पटेटीही तेव्हाच. रजांकडे डोळे लावून 'सांग सांग भोलनाथ सुट्टी मिळेल का?' असं विचारावं लागत नाही. एका पाठोपाठ लागून सुट्टी येतेय् का?, वीकेन्ड मोठा होतोय् का?, बाहेरगावी जाऊन मोकळा वारा अंगावर घेऊन, रेन डान्सची संधी येतेय् का?...असले प्रश्न मात्र या महिन्यातच खेळते असतात. जूनमध्ये कॉलेजेस् उघडली तरी मैत्रीला, 'इव्हेन्टस्' ना धुमारे याच महिन्यात फुटतात. 'ट्रेकींग'ला जा; पाऊसगाणी गा, बाइकराईडवरून घसरण्याचा उन्माद भोगा, मैत्रीदिन पाळा आणि मित्र मैत्रिणी आणखी....आणखी....आणखी वाढवा....; हे सगळं सगळं याच महिन्यातलं वाण लुटायचं असतं की! श्रावणात अशावेळी अख्खा पाऊस कुणीतरी कुणालातरी बक्षिस देऊन टाकत असतं. आभाळातलं श्रावणातलं इंद्रधनुष्य अलगद् मनात रंगीबेरंगी होत उतरतं असतं:

श्रावणाचं हे मनमोहक रूप देखणंच आहे. उगाच नाही कवीनं म्हटलं, 'सृष्टीला पाचवा महिना!' चैत्र,वैशाख,ज्येष्ठ,आषाढ या चार महिन्याचं गर्भतेज या पाचव्या महिन्यात सगळीकडून झळाळतं नुसतं. 'सावन, मनभावन' च असतो केवळ.

याच महिन्यात मित्रहो, आपलांही एक आणखी मोठ्ठा आनंददायी 'सण' येतो. कोणता?....नाही ओळखता येत? बघा आठवून. 'प्रभुतरुणा'चा वर्धापनदिन हो! सणच नाही का तो आपल्यासाठी? राष्ट्रीय सण जसा स्वातंत्र्य दिनी साजरा होतो तसा हा सामाजिक,सांस्कृतिक सणच. प्रभुतरुण परिवाराचा. हा परिवार फार मोठा आहे. त्यात आबालवृद्ध सगळ्या सगळ्यांचा समावेश आहे.

या वर्धापनदिनाच्या सणाला केवळ आनंदाचं उधाण येत नाही. बरोबरीनं मोठ्यांचे आशीर्वाद मिळतात. सुहृदांच्या शुभेच्छांचा लाभ होतो.'युवामंच'मध्ये संख्यात्मक वाढ होते. या सगळ्यामुळे प्रभुतरुणाची गुणात्मक इयत्ताही सातत्याने वाढती रहाते. म्हणूनच तर प्रभुतरुण सतत चढत्या आलेखाने, खऱ्या अर्थाने वाढतोय. आनंदाचा श्रावण रिमझिमतोय. प्रभुतरुणात कमीत कमी सहा लेख दर महिन्याला येणं हे त्याचंच फळ आहे. लेखांमध्ये विविधता किती? माहिती, विचार, रंजन, लालित्य, संवाद यांनी भरून गेलेले लेख वाचकांना भरभरून आनंद देतात. पुन्हा मराठी आणि इंग्रजी भाषा हातात हात घालून येतात. हा नवा उपक्रमही तरुणाईला कवेत घेणारा आहे. दर महिन्याला व्यंगचित्र असणं हीदेखील आतापर्यंत प्रभुतरुणाची खासियत ठरलीय. आधीप्राचार्य विजयकरांची 'विजय करी' होती. आता 'हसरी रेखा' असते. 'टुगेदर टोवर्डस् टुमारो'हे ब्रीदवाक्य घेऊन संपूर्ण पान युवामंचाचं असतं. लेखमाला,सदरं असतातच. श्रावणात येणाऱ्या वर्धापनदिनी भरगच्च दिवाळी अंकाचीही आखणी असतेच. हे सगळं मित्रहो, तुम्हा सगळ्यांच्या शुभेच्छांचं फलित. सहकार्याचं बळ. म्हणूनच या श्रावणाला श्रावणाचा आनंद बनूनच सलाम!

## अभिनंदन

कु. वैजयंती विश्वास अजिंक्य हिला आंतरशालेय नेमबाजी स्पर्धेत (१९वर्षांच्या आतील गटात)–(दहा मीटर एअर पिस्तुल स्पर्धा) मुंबई शहर विभागात सुवर्णपदक आणि पाठोपाठ मुंबई शहर, उपनगरे, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, रायगड या प्रभागात रौप्यपदक लाभले. ३ ते ५ डिसेंबर २०१० मध्ये कर्नाल येथील राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेतही ती सहभागी झाली होती. तिच्या या उपक्रमाबद्दल शालान्तं परीक्षेत तिला अतिरिक्त २५ गुण देण्यात आले. अभिनंदन.

## अभिनंदन

प्रभु प्रभात बोर्डाच्या सदस्या श्रीमती स्वाती प्र.राणे यांनी दिनांक.१६ जून २०११ रोजी, खारच्या सांस्कृती स्त्री मंडळात ''काव्य आणि माझी कविता'' या विषयावर कार्यक्रम सादर केला. त्यांच्या मातोश्री कै.डॉ.गुलाब धुरंधर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांनी हा कार्यक्रम सादर केला आणि त्यांच्या ''शिंपला'' या काव्यसंग्रहातील काही कवितांचे गायन श्रीमती क्षमा कोठारे यांनी करून उपस्थित महिलांचे मनोरंजन केले. सर्व भगिनांना श्रीमती स्वाती यांनी काव्यसंग्रहाच्या प्रती भेट दिल्या. अभिनंदन.

(पान १ कॉलम ४ वरून)

mean that you are politically well connected too?

Well, as it is said, some people have all the luck with them, maybe you are one of them. You are the supreme power and I can do nothing but bow to you. Maybe some day you will take pity or get tired of winning all the time and let me be the winner for one whole day. The least I can do is wait in hope of this glorious day.

After all, time will tell, so You will tell!

Yours painfully,

The Loser

Dear Warrior against Time,

Some tips to win some day:

** Stop spending every waking moment thinking about the past or concerned about the future

** Your smart phone is not the object of your affection, find a real one

** Stop trying to freeze time by capturing moments on your camera, start enjoying them

** There is so much beauty around you, open your eyes

** There is a big humourous side to all your mistakes, don't analyze the mistakes, laugh at them

** Lastly deactivate your Facebook account

Stop texting, put your phone away, look up, live your life. Embrace the time you have instead of trying to kill it. The next opportunity to live is right now.

Someday I would love to see you waiting at the platform before time for the train to arrive, I would love to see a satisfactory smile on your lips when you hear the alarm ringing some morning and would love to see you winning…against me!

Yours affectionately,

TIME

●

## चिरतरुण किकीबाय्

लक्ष्मीबाई माधव प्रभाकर परवा गेल्या. आपल्या सर्वांच्या किकीबाई. साक्षात प्रसन्नता. प्रभाकर कुटुंबाची खरोखरच लक्ष्मी! प्रमोद नवलकर यांच्या सुपीक कल्पनेतून ''प्रौढ प्रभूसुंदरी' स्पर्धा साकारली होती. त्यातील प्रभूसुंदरी म्हणून विजेत्या किकीबाय्चा देखणा, दिमाखदार फोटो अगदी टाइम्सच्या पहिल्या पानावर झळकला होता. चिरी, कापबाळ्या, नथ घालून प्रभू संस्कृती आणि संपन्नतेची आभा मिरवणारा तो फोटोतील चेहरा आजही स्मरणात आहे.

ही संस्कृती आणि संपन्नता त्यांच्या वागण्याबोलण्यातही होती. 'प्रभुतरुणा'च्या अमृतमहोत्सवी वर्षात एक खास समिती स्थापन झाली होती. तिचे अध्यक्ष होते श्री. माधवराव प्रभाकर. अध्यक्ष या नात्याने समितीच्या काही सभा प्रभाकरांच्या खारच्या घरी झाल्या. त्यावेळचे किकीबायचे अगत्य काय विचारता? त्यांच्या प्रसन्न आगतस्वागताने एखाद्या पवित्र मंदिरातच आल्यासारखे वाटायचे. त्यांचा जेवणाचा आग्रह गृहलक्ष्मीचा असायचा. आलेल्या पाहुण्यांनी काही फळे, मिठाई भेट म्हणून आणली तर किकीबाय् ती आधी देवासमोर ठेवायच्या. 'इदं न मम्!' असाच जणू भाव. त्यांच्या बोलण्यातली मिठ्ठास तर त्यांच्यासारखीच कायम चिरतरुण!

अशा चिरतरुण असलेल्या किकीबाय् गेल्या. वय एकोणनव्वदीचं असलं तरीही व्यक्तिमत्त्व चिरतरुणच. अशा चिरतरुण किकीबाय्ची आपल्या मनी असलेली आठवणही चिरतरुणच रहाणार आहे.

त्यांच्या कुटुंबीयांना दु:ख सहन करायला या आठवणींचं बळ लाभो.

●

## पाठारे प्रभु सोशल समाज

ह्यावर्षा समाजाची वर्षा सहल ३ जुलै रोजी नंदनवन रिसॉर्ट विरार पूर्व येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाली. रेन डान्स, पोहण्याचा तलाव, हाऊझी पासिंग द पार्सल, संगीत खुर्ची ह्य सर्वांचा मनमुराद आनंद लुटला. गेल्यावर्षीप्रमाणेच ह्यावेळी येताना भजनसन्स ह्या दुग्धशाळेला भेट देऊन दुग्धजन्य पदार्थाची खरेदी केली. वाढत्या प्रतिसादामुळेच पुढील वर्षी दोन बसेस कार्यकारिणीला कराव्या लागतील असे वाटते.

## अभिनंदन

कु. वैजयंती विश्वास अजिंक्य हिला आंतरशालेय नेमबाजी स्पर्धेत (१९ वर्षांच्या आतील गटात) - (दहा मीटर एअर पिस्तुल स्पर्धा) मुंबई शहर विभागात सुवर्णपदक आणि पाठोपाठ मुंबई शहर, उपनगरे, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, रायगड या प्रभागात रौप्यपदक लाभले. ३ ते ५ डिसेंबर २०१० मध्ये कर्नाळा येथील राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेतही ती सहभागी झाली होती. तिच्या या उपक्रमाबद्दल शालान्त परीक्षेत तिला अतिरिक्त २५ गुण देण्यात आले. अभिनंदन.

●




# 'हस दे तू!'

## प्रियतम्मा....

चित्रपट - धूमधडाका (१९८७)
संगीत - अनिल - अरुण
स्वर - सुरेश वाडकर, शब्बीर कुमार, उत्तरा केळकर
गीत - शांताराम नांदगावकर
पात्रयोजना - महेश कोठारे-महेश जवळकर, अशोक सराफ-अशोक गुपचुप, शरद तळवलकर-धनाजीराव वाकडे, निवेदिता जोशी, प्रेमा किरण-धनाजीरावांच्या मुली.

'धुमधडाका' हा हिंदी चित्रपट 'प्यार किये जा' चा रिमेक आहे. हिंदी चित्रपट खूपच लोकप्रिय झाला. त्यात शशीकपूर, किशोर कुमार, मेहमूद, मुमताझ, ओमप्रकाश अशा नावाजलेल्या कलाकारांनी काम केलं होतं. संगीत लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचं होतं. गंमत म्हणजे मूळ तामिळ चित्रपट काडलिक्का नेरमिल्लाइ यावरून 'प्यार किये जा' बनवण्यात आला. गाजलेल्या चित्रपटाचा रिमेक करणं म्हणजे एक दुधारी शस्त्र आहे. मूळच्या गाजलेल्या चित्रपटाची लोकप्रियता पाठीशी असते. पण त्याचबरोबर तुलना करून किंवा तेच ते काय बघायचं असा विचार करून लोक पाठ फिरवण्याची शक्यता असते. विशेषत: हिंदीमधून मराठीत चित्रपट आणण्यात जरा जास्तच धोका असतो. पण अभिमानाची गोष्ट अशी कीं, 'धूमधडाका' तितकाच गाजला, बॉक्स ऑफिसवर हिट ठरला.

महेश जवळकर हा होतकरू, तरूण इंजिनिअर धनाजीराव वाकडे यांच्या फॅक्टरीत कामाला असतो. धनाजीराव यांची मुलगी निवेदिता हिच्याबरोबर महेशची वादावादी होते. धनाजीराव महेशला कामावरून काढून टाकतो. याचा बदला घेण्यासाठी तो आपला मित्र अशोक गुपचुप याला बोलावून घेतो. अशोक महेशच्या रईस, श्रीमंत बापाचं सोंग आणतो. आता महेश निविदेताच्या प्रेमात पडलेला असतो तर प्रेमा अशोकची मैत्रीण असते. पण इकडे अशोकची पंचाईत होते. बापाचं सोंग आणल्यामुळे त्याला आपलं प्रेम व्यक्त करता येत नाही.

अशोक प्रेमाच्या मागोमाग बागेत येतो. अशोक सुटा-बुटात (Three piece suit) हातात काठी, डोळ्याला चेनवाला चष्मा, पांढरी करडी दाढी, लांब केस, तोंडात पाईप अशा श्रीमंत खानदानी वेषात असतो. बागेत प्रेमाची छेड काढतो, काठीने तिचा पाय ओढतो. ती त्याच्यापासून दूर पळत असते. तिला कल्पना नसते की हा तिचा अशोक आहे म्हणून.

अशोक - प्रियतम्मा, प्रियतम्मा दे मला तू चुम्मा
प्रेमा-''चलहट!''
अशोक - प्रियतम्मा, प्रियतम्मा दे मला तू चुम्मा चार दिसांची ज्वानी....
प्रेमा - ''ज्वानी ? तोंड बघ''....
अशोक - हा, चार दिसांची ज्वानी, खेळू प्रितीचा झिम्मा प्रियतम्मा....
प्रेमा - ''ये म्हातारड्या चल हो बाजूला.''
अशोक - अरे, जरी म्हातारा घोडा दिसतो, पावर भारी माझी शृंगाराची डर्बी जिकीन होशील मग तू राजी प्रियतम्मा....
प्रेमा अशोकवर कराटेचे वार करते. त्याला दूर पळवण्याचा प्रयत्न करते. अशोक तिचे वार अडवून तिला जखडून ठेवतो.
अशोक - ये मिठीत ये ना, जाणून घे ना माझे अस्सल रूप मला बिलगता कळेल तुला आपोआप
येथे अशोक दाढी मिशा काढतो. प्रेमा त्याला ओळखते. आनंदाने त्याच्या बरोबर नाचू लागते.
अशोक - श्री देवी तू, जयाप्रभा तू, तू माझी हेम्मा प्रियतम्मा....

## घामही फुटला....

चित्रपट-थरथराट (१९८९)
दिग्दर्शक,कथा,पटकथा-महेश कोठारे
गीत-प्रवीण दवणे
संगीत-अनिल मोहिले.
प्र.भूमिका-महेश कोठारे, लक्ष्मीकांत बेर्डे, निवेदिता,प्रिया अरुण.

लक्ष्याची प्रेयसी गंगू लक्ष्याला डिवचत असते 'अरे असा काय गुंडांना घाबरतोस. त्यांना सामोरे जा.'

गंगू- घेऊन हिम्मत मर्दावानी तू लाव सगळ्यांची वाट तू लाव सगळ्यांची वाट

लक्षा- हिम्मत कसली जिवास माझ्या झाली ग घबराट घामही फुटला....घामही फुटला अंगाला या सुटालाय ग थरथराट.

गंगू- ''अरे कसला थरथराट,हो डॉन आणि उडीव दाणादाण.''

लक्षा- ''डॉन का इन्तजार तो ग्यारहो मुलकोंकी पुलीस कर रही है लेकिन डॉन को पकडना मुश्किलही नहीं नामुमकीन भी है'' अरे येड्यानो, मला पकडाहो, मी आहे डॉन मी आहे डॉन, मी आहे डॉन, मी आहे डॉन-डॉन-डॉन.

गंगू- ''आता कसं?''

लक्षा- ''अगं नाही गं!''

घामही फुटला अंगाला या सुटलाय गं थरथराट

गंगू- ''अरे रे, पुन्हा तोच घबराट, दाखव की शत्रूचा शत्रू.''

लक्षा- ''खामोश! जळी तो आग कहते है बुझी को राख कहते है, जिस शराब से बारुद बनती है उसे लक्ष्मीकांत कहते है''

जोर चढलया जोर माझ्या दंडात चढलाय जोर आडवा आला जर कोणी, चढवून देईन लाफे दोन

गंगू- ''हां! असं पाहिजे.''

लक्षा- ''अगं असं नाही गं'' घामही फुटला.....

गंगू- ''अरे कुठे गेला तुझा जोर, हो की डिस्को फायटर''

लक्षा- आय ॲम डिस्को फायटर

गंगू- ''हा आता बरोबर आहे''

लक्षा- ''अगं असं नाही'' घामही फुटला....

गंगू- बंद कर तुझ रडगाणं,दाखव की जरा हंगामा''

लक्षा- ''हंगामा! जय हंगामा,कहा गई मेरी गंगामा'' हम भोले हो तो क्या हुआ ताकदवाले है

गंगू- ''तुमची एवढी आराधना केली तरी तुमचा हयोच अवतार''

लक्षा- राजेश खन्नाचा सुप्रसिद्ध डॉयलाग ''रो मत गंगू....आय हेट आसू''

माझी प्यारी गंगनीया आलो राजेश बनुनीया घामही फुटला....

गंगू- ''मग बसा थरथरत,ही मी चालले''

लक्षा- असं कसं मला हो साऱ्यांनी छळलं

अग फायटींगच मला हे गुपित कळलं

कुंग फू,कराटे आता लागीन खुशाल खेळायला

तवा लागेल पब्लीक हे, ह्या लक्षाला मानायला

हे एक विडंबनात्मक गीत (Parody song) आहे. हा प्रकार बऱ्याच वेळा पाहायला मिळतो. 'मि.इंडिया' मध्ये असंच एक गीत आहे. ह्या गीताबद्दलदेखील वेगळं भाष्य करण्याची गरज नाही. संपूर्ण गीत वाचल्यावर त्यातली गंमत कळून चुकेल. लक्षाने,अमिताभ बच्चन,शत्रूघन सिन्हा,मिथून चक्रवर्ती,मेहमूद,राजेश खन्ना या सर्वांची अदा अशी खुमासदारपणे पेश केली आहे की पूछो मत. शेवटी सर्व घाबरटपणा विसरून,लक्षा हिंमत दाखवतो. (नवीन पोपट हा) आणि कुंगू फू-कराटे खेळायला लागतो. सुदेश भोसलेनेही अमिताभ, मिथून, शत्रुघन यांच्या आवाजाची नक्कल करून यात रंग भरलाय.

-नंदकुमार विजयकर
nandusuhas03@gmail.com

## अभिनंदन

अमेरिकेतील टॅम्पा येथील 'ग्रॅण्ड पॉवर' या संस्थेच्या दशकपूर्ती वर्धापन दिनी सौ.सुषम उदय आत्माराम हरिश्चंद्र कीर्तिकर यांना त्यांच्या 'पहेचान' या संस्थेच्या कार्याबद्दल पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. 'पहेचान' ची खरी पहेचान अशी आहे— मुलांना अडचणींतून सोडवणे,भारतीय स्त्रियांना आधाराचा हात देणे, जीवनसाथीकडून वंचित झालेल्या भारतीय स्त्रियांना मदत आणि मार्गदर्शन करणे, भारतातून परदेशीय संस्कृतीत शिरलेल्या स्त्रियांना भारतीय संस्कृतीचा तिथेही स्पर्श लाभावा याकरिता झटणे आदी. ही संस्था सौ.सुषम यांनीच सुरु केली आहे.

पूर्वाश्रमीच्या कु.सुषम सुरेश रामराव गणपतराव विजयकर असलेल्या या संस्थापिकेने पुरस्कार स्वीकारताना आईवडिलांच्या ऋणाचा आपल्या भाषणात उल्लेख केला. चित्रकार कै.सुंदरराव गोरक्षकरांची कन्या सौ.अनारकली या त्यांच्या आई. 'आईने, माझे हदय सह्रदय केले आणि वडिलांनी माझ्या मनाची कवाडे उघडली' असा उल्लेख त्यांच्या भाषणात त्यांनी केला; तेव्हा भारतीय संस्कृतीचीच 'पहेचान' या भाषणातून झाली! अभिनंदन.

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# YUVA MANCH

Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :**

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us.

Due to some technical reasons, the website has not been functional, but we will soon get it up and running. We apologize for the inconvenience caused. We will provide you with new user name and password. Please get in touch soon.

## "THE SHOW MUST GO ON"

**-SWEEKAR SURESH MATHKAR**
*HEAD-OPERATIONS & ARTIST MANAGEMENT*
*COLOUR EVENTS & PROMOTION*
*GUEST FACULTY- EMDI INSTITUTE OF MEDIA & COMMUNICATION*

Awards Ceremony, Promotions, wedding, theme parties, celebrity management, roadshows, conferences, seminars, college festivals, product launch…..

At least once in your lifetime you must have heard about it or encountered in real life.

What is it? Is it glamour? Is it Fun? Questions & Curiosity.

The answer is 'Event Management'

Events have become an integral part of our society. Whether it's a birthday party, anniversary or say 'Pratyush', every one of us plays a role of an Event Manager.

The difference- is in executing it uniquely & with a professional approach.

Event Management industry is booming day by day with need for professional experts in great demand. College festivals give high exposure to this field & students can explore their inbound skills in various arenas of events. Event manager should understand the purpose of doing certain event (objectives), the budgets associated and the ROI expected from event activation.

Unfortunately many youngsters enter this field due to attraction towards glamour which eventually becomes a short term career. If you are creative, innovative, smart/hard working & love doing 9-5 job (no am or pm), this is the right field to get in.

What goes in to it- a client brief, conceptualizing, making budgets which are realistic, practical production values and flawless execution plays an important role.

You can be a part of Event Industry in following departments:

Creative & Marketing
Event conceptualizer
Graphic artist/designer
Set designer
Theme & Décor specialist
Show director
Script/speech writing
Wedding planner
Sponsorship planner
Marketing & media
Production & Operation
Production executive
Operations & logistics
Backstage managers
Cost & budget controllers
Incentive managers
Venue management
Risk Management
Safety & security
Hospitality & catering
Exhibition contract
Entertainment
Promoter
Artist Management
Theme park management
Entertainment supplier
Choreographers
Technical
Technical director
Sound engineer
Lighting designer
Sfx specialist

An event manager is responsible for security & crowd control, backstage management, front stage management, on stage management, console management, manpower allocation & event roll-out control.

One should possess the quality for:

* Creative perspective
* Considerable planning
* Conscientious budgeting
* Customized & quality driven execution

Today every brand needs the support of Above The Line (ATL) & Below The Line (BTL) activity for brand awareness & market penetration. Events cater in BTL category.

There are 2 ways of entering this field. Either you join an event agency directly and learn the hard way or else acquire professional qualification and then be the market leader.

The 1st option is quiet risky, you might get exploited and may loose valuable time, money & energy. The 2nd option helps in long term. Along with event companies various corporate firms, hotels & resorts (service industry) require in-house event managers. The brand promotion departments of MNC recruit certified event managers which becomes an added advantage. Radio stations & Television channels bounce in on event managers for radio based events / promotions & televised events/ reality shows. What really matters is how you fit yourself in these sectors as per your skills & interest.

Event manager has to be mentally, emotionally & physically strong enough to bypass all eventualities associated with this field. Last moment event finalization/ cancellations, tight deadlines, artist backout, vendor double cross, payment/salary delays have to be managed tactfully. Many event companies are mushrooming nowadays which creates an unhealthy cut-throat competition, but those who believe in customer satisfaction & genuine service can only sustain. If you believe in yourself & in high IMAGE value (innovative, master, authentic, guts, ethics), creating an impact is much more easier.

Various institutes offer courses (one year part time & full time) in event management. Apart from classroom knowledge where you interact with industry experts, on field training at various events shapes you in right direction. Basic qualification is either (10+2) or graduate in any stream. On course completion, you can join the above sectors, work as a freelancer or start your own firm.

Last but not the least- be your own counselor, make a right decision, once you get in no matter what strive hard to make a difference and set an example for new aspirants in this field & the show must go on.




## Good Natured SWEDES

**-Ajit Mankar**

Sweden, as every one knows, is one of europe's wealthiest nations judged by its per-capita income.Swedes enjoy absolute freedom of anything and everything.Given this background I first thought that the Swedes would treat the people of other backward countries such as ours with downright contempt.This was my initial impression when I entered this country last year.

However,within a short while,my first impression changed dramatically.I have yet to come across more well mannered,well behaved and friendly Customs officers at any airport of the world other than Stockholm, Tejasweeni and self spent a few nights at Rica International Hotel in Stockholm.We checked in around noon,and after a small grub, I decided to take a nap in our room on the 3rd floor while Tejasweeni decided to venture out for shopping(her favourite pastime)in the mall nearby along with other women folk of our group.

Suddenly.I felt that the central A.C.was not at all cooling the room.I soon became restless and called for assistance.A black electrician turned up and tried to fix it up with no success.He retreated saying he would send the on duty electrical engineer of the hotel to locate the fault.

A smart, beautiful,tall and slim young girl then came knocking.She introduced herself as Sandra,the qualified electrician in-charge of the hotel and started to locate the fault.After a while she advised me to have patience and vanished for a short-while.

Sandra came back again and told me that since the fault can not be rectified so soon,she had arranged a beautiful up-graded suite for me. Within seconds, before I could realise what was happening around me,she started dumping the belongings scattered all over the room in to our 3 fairly large sized suitcases,picked up all the heavy bags in one stroke,and advised me to follow her. I was literally stunned to see her herculian stamina of lifting 3 bags in one go and carrying the same upstairs(by lift,ofcourse)to my newly assigned extra-ordinarily beautiful suite on the 15th floor with the best of views ever.

(Cont. on page 5 col. 1)

(Cont. from page 4 col. 4)

In the meantime,some one from our group who had spotted our logistical movements jokingly told Tejasweeni to rush and take control of the situation before it is too late.He did not forget to narrate that some beautiful young thing was seen literally carrying Ajit and bags in her arms side by side all together and rushing in a frenzy.

No need to say, Tejasweeni followed to our new room unaware of what had happened around, while Sandra was still coolly busy unpacking and setting the wardrobe of the room in a better order than before.

I introduced Sandra to Tejasweeni and described in short, the earlier happenings.We both thanked Sandra for her out of way efforts and help.She politely replied that a foreigner is God as far as her country is concerned and that it really gave her pleasure and satisfaction to do whatever she could to make our stay comfortable.She was very sweet.What I liked most in her attitude was there was no slightest descrimination towards us being non-Europeans. I clicked a photograph of Sandra and Tejasweeni together, with her consent, for cherishing sweet memories of Sweden.

Our coach-captain George was a hefty and typically patriotic 70 years old boy.He was curiously observing us consistently conversing in English amongst us.Some how, it seems, he felt it unpatriotic on our part not to converse in any of the Indian languages. At one stage he lost patience and interrupted us abruptly by asking if we do not have a local language to converse in by way of national pride.To cool him down,I told him that English and Hindi,both are official and national languages as per Constitution of India and Indians have mastered English so well over the centuries, that English is never considered and treated as a foreign language in India.In fact, this is the real reason why India is progressing rapidly and catching up fast with the developed world. He was totally satisfied with the explanation and that moment onwards. started freely mixing and enjoying company of our group wholeheartedly during the course of our stay in Sweden.

There was the national day of Sweden during our stay.Our group was out of stock of Scotch and all the shops were closed that day being the national holiday.Previous day we had enquired about the price of a certain brand sold at swedish croner 110/-at all shops.While hunting out,we located a shop opened in a way-side ally.It was owned and run by a Pakistani family who had migrated to Sweden two generations ago and since become the Swedish nationals.

The owners were really happy to receive Indians in their shop, which was a rare event for them,as a very few Indians venture out to Scandinavian countries for tourism as such.It is a common experience abroad whichever country you may go,when Indians meet Pakistanis, or vice versa,they always blindfoldedly treat each other as brothers,and even freely extend invitations to come over for dinner at home.In such cases previous acqaintance is not at all required.Pakistanis settled abroad are really kind hearted to Indians.At least,this is my personal experience everywhere.

Being the last day in Sweden, we were organising a party in the hotel that night.But the difficulty was we had only the last note of 100 sw.cr.and the Scotch was costing 110 sw.cr..Understanding our difficulty,our Pakistani shop-keeper brother called for the note of 100.We were feeling sorry that we are short of cash.The shopkeeper consoled us by saying not to worry and to our surprise handed over to us the bottle alongwith a note of 10 sw.cr.as discount.He explained that this is his token of love and brotherhood and forced us to retain the note.We thanked the family and returned to our hotel full of sweet memories of Sweden.

●

## पाठारे प्रभु महिला समाजाची सहल

जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात 'गुजरात द्वारका देऊळ,बेट द्वरका,सोरटी सोमनाथ देऊळ,गीर फॉरेस्ट' या ठिकाणी राहण्याची सहल आयोजित केली आहे. सहलीचे संपूर्ण शुल्क रु.७५००/- राहील. तिकीट रिझर्व्हेशनसाठी रु.१०००/- त्वरीत भरावे. अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०११ आहे.

महिला समाजाचा वार्षिक अहवाल नेटकेपणाने निघाला आहे सर्वांना तो पोहचला.

पाठारे प्रभु महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १९ ऑगस्ट २०११ रोजी प्रभु सेमिनरी सभागृह भाईजीवनजी लेन ठाकुरद्वार येथे दुपारी ४ वाजता घेण्यात येईल. त्याच दिवशी पुढील स्पर्धा घेण्यात येतील.

१) *स्मरणशक्ती स्पर्धा* - (कागद पुरविला जाईल)

२) *कलाकौशल्य स्पर्धा* - विषय हातावर मेंहदी काढणे. (मॉडेल ज्याचे त्यांनी आणावे.)

३) *काव्य स्पर्धा* - विषय श्रावण (काव्य घरून लिहून आणणे)

४) *निबंध स्पर्धा* - विषय मुंबईचे बदलते स्वरूप (शब्दमर्यादा महिलांसाठी-६०० शब्द घरून लिहून आणणे)

५) *निबंध स्पर्धा* - मुलीसाठी विषय माझे आवडते शिक्षक (मराठी) My Favourite Teacher (इंग्रजी) : वयोमर्यादा १५ वर्षाखालील (निबंध घरून लिहून आणणे)

काव्य व निबंध १९ ऑगस्ट २०११ पर्यंत चिटणीसांकडे द्यावेत. ज्या मुलींना शिष्यवृत्तीचे अर्ज भरावयाचे असतील त्यांनी ते ३१ जुलै पर्यंत सौ.मेघना राणे, श्री.सिद्धारुढ प्रसाद, ३६२,ब्लॉक नं.१, १ला मजला, जे. एस. एस. रोड, मुंबई-२ येथे आणून द्यावेत.

महिला समाजाचा ९७वा स्थापना दिन शनिवार दिनांक १७ सप्टेंबर २०११ रोजी दुपारी ४ वाजता पुरंदरे सभागृह, साहित्य संघ मंदिर ५वा मजला, केळेवाडी, चर्नीरोड येथे साजरा करण्यात येईल. त्यावेळी पुढील स्पर्धा घेण्यात येतील.

१) संगीत स्पर्धा महिलांसाठी व मुलींसाठी (१५ वर्षाखालील)
विषय : अभंग वेळ ३ ते ५ मिनिटे

२) नृत्य स्पर्धा - (सभासदांच्या मुलामुलींसाठी)
मुली - वयोगट ५ ते ९,१० ते १५
मुले - वयोगट ५ ते ९,१० ते १५
विषयः चित्रपटगीतावरील रेकॉर्ड डान्स-स्नेक डान्स
महिलांसाठी - वयोगट १६ ते २५ व २६ ते ४० व ४० वर्षावरील

### पाठारे प्रभु सोशल समाजाच्या सर्व साधारण सभेची सूचना

समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक. १४ ऑगस्ट २०११ रोजी सायंकाळी ५.०० वा. प्रभु सेमिनरी शाळा सभागृह,भाईजीवनजी लेन,ठाकुरद्वार, मुंबई-४०० ००२.येथे घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

(सभेपुढील कामकाज)

१) सूचना परिपत्रकाचे वाचन.

२) समाजाच्या रविवार दिनांक. ५ सप्टेंबर २०११ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची टिपणे वाचून मंजूर करणे.

३) समाजाचा १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११चा कार्यवृत्तांत अहवाल वाचून मंजूर करून घेणे.

४) समाजाच्या कार्यकारिणीचा १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ सालाचा जमाखर्चाचा ताळेबंद सादर करणे व मंजूर करून घेणे.

५) स्टेटबँक ऑफ इंडिया या बँकेव्यतिरिक्त इतर बँकेत खाते उघडण्याविषयी विश्वस्तांना अधिकार मिळण्याबाबत मंजूरी घेणे.

६) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारी कामे.

विशेष सूचनाः १) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी, त्याच दिवशी आधी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर (म्हणजे ५।। वाजता) घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येचे बंधन रहाणार नाही.

२) समाजाचा अहवाल व जमाखर्चाचा ताळेबंद शनिवार दिनांक ६-८-११ व रविवार दिनांक ७-८-११ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत समाजाचे संयुक्त चिटणीस श्री.जयंत कीर्तिकर-चंद्रकला, तिसरा मजला,डिलीव्हरी पोस्ट ऑफिससमोर,७वा रस्ता,खार (प.), मुंबई-४०० ०५२ येथे पहावयास मिळतील. काही प्रश्न असल्यास बुधवार दिनांक १०-८-११ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत लेखी स्वरूपात वरील पत्त्यावर देण्यात यावेत असे कळविण्यात येते.

संयुक्त चिटणीस,
सौ.नीता मिलिंद सेंजित : ९८२०१६६६२८
श्री.जयंत बाळकृष्ण कीर्तिकर : ९८६७९५८५३५

सोशल समाजाचा वार्षिक अहवाल घरोघरी पोहोचला. सनदी लेखापालांनी संमत केलेले आर्थिक हिशोब आणि कार्यक्रम वाचून आनंद वाटला.

खालील मान्यवरांनी उदार हस्ते देणगी देऊन संस्थेच्या ह्या उपक्रमाला आशीर्वाद दिले.

**देणगीदारांची नावे**

१) कु.मीनल प्रधान रु.५,०००/-
२) सौ.सुलेखा राजन विजयकर रु.२,०००/-
३) सौ.योगिता व श्री.किरण नवलकर रु.१,५००/-
४) सौ.प्रमिला मधुकर तळपदे रु.१,५००/-
५) श्रीमती सरोज ज. प्रधान यांच्याकडून रु.१,००१/- (कै.श्री.जयवंत प्रधान यांच्या स्मरणार्थ)
६) सौ.अस्मिता व श्री.राहुल प्रधान रु.१,००१/- यांच्याकडून (ग्रँडपेरेन्टस्च्या स्मरणार्थ)
७) श्रीमती वंदना प्रमोद नवलकर रु.१,००१/-
८) श्री.सी.आर.जयकर (बाबा जयकर) रु.१,०००/-
९) श्री.संतोष आणि श्री.अरविंद नवलकर रु.१००/-

## प्रभु सेमिनरी

यंदा दहावीचे शंभर टक्के यश सेमिनरीने मिळवले आहे. दारिद्र्यरेषे खालील विद्यार्थ्यांवर शिक्षकांनी अधिक मेहनत घेतली; त्याचे हे फलित. या विद्यार्थ्यांना पुस्तके, भोजन आदी सहाय्य केले जाते. या यशाप्रीत्यर्थ अनेक दात्यांनी उत्स्फूर्त देणग्या दिल्या. अनामिकाकडून दप्तरांसाठी रु.७०००/-, रोषणाईकरिता सौ. प्रमिला आणि श्री. मधुकर तळपदेंकडून १५००/- सौ. उर्वशी धराधर आणि नानटकरकडून विद्यार्थ्यांना १०१/- (प्रत्येकी) बक्षिसे अशी मदत लाभली. अध्यक्ष श्री. सुभाष राव यांनी प्रभुतरुणाच्या संपादकांना पेढे पाठवले. शाळेच्या यशामुळे ते अधिक गोड लागले !

## प्रभुतरुणास देणगी

- सौ. सुमालिनी आणि श्री.श्रीपाद काळूराम विजयकर यांजकडून ६-७-११ रोजी झालेल्या त्यांच्या विवाह सुवर्ण महोत्सवा प्रीत्यर्थ रु.१००१/-
- सौ. वृंदा शाम जयकरकडून त्यांची नात कु.अपेक्षा प्रशांत राणे हिच्या न्यूयॉर्क येथे झालेल्या विवाहा प्रीत्यर्थ रु.५०१/-
- सौ. उषा आणि डॉ.अरुण वसंत जयकर यांजकडून नातू अमरीश रोहित जयकर दहावी परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाल्याबद्दल रु.२५१/-
- सौ. उत्तरा ललित कोठारे यांजकडून आजीव सदस्यत्व रु.३५०/-
- सौ. कविता मनोहर धुरंधर यांजकडून त्यांची कन्या श्वेता मनोहर धुरंधर यांच्या स्मरणार्थ रु.१०१/-
- डॉ. प्रभाकर वि. कोठारे यांजकडून त्यांचे पुत्र श्री. प्रणील कोठारे यांच्या F.R.M. या यू.एस्.ए. येथील परीक्षेतील यशाप्रीत्यर्थ रु.५०१/-
- सौ. नेत्रा आणि श्री. विनोद माधव प्रभाकर यांजकडून त्यांचे पुत्र श्री. अमेय प्रभाकर यांच्या बी.एस्सी. आणि एन्ट्रन्स परीक्षेतील नेत्रदीपक यशाबद्दल रु.५०१/-
- श्री.संदीप लालसेन कोठारे यांजकडून त्यांचे सुपुत्र श्री. तन्मय यांच्या परीक्षेतील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ रु.२५१/-

## परीक्षेतील सुयश

**दहावी**

श्री.स्वप्नील संतोष धैर्यवान,
८४.५५ टक्के

कु. प्रांजली अनिल व्यवहारकर,
८५.०९ टक्के

श्री. प्रतिक प्रकाश विजयकर,
९४.३६ टक्के

**बारावी**

कु. रचिता राजेश मानकर,
४३९/६००, ७३.१७ टक्के

**बी.एस्सी**

श्री. सौरभ निलेश प्रधान,
प्रथम वर्ग

**बी.कॉम्.**

कु. स्वप्ना संतोष धैर्यवान,
७६.४३ टक्के

श्री. निहाल तुषार कीर्तिकर,
६९ टक्के

श्री.वीरधवल दीपक विनायकराव तळपदे,
द्वितीय श्रेणी

श्री. चिन्मय विजित धुरंधर, प्रथम वर्ग

श्री. तन्मय संदीप कोठारे, प्रथम वर्ग

**बी.एम्.एम (मुंबई विद्यापीठ)**

कु. ऐश्वर्या नूतन विष्णू वाचकर
६८ टक्के

**बी.टेक. (एस.एन.डी.टी)**

रचिता धीरेन धुरंधर, प्रथम वर्ग

कै. रामराव गणपतराव विजयकर आणि त्यांचे सहकारी कै.खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर यांची पणती कु. मैथिली सतीश प्रधान हीस लंडनमध्ये सदबी विद्यापीठातून आर्ट बिझनेसमध्ये एम्.ए.ही विशेष गुणवत्तेसह पदवी प्राप्त झाली.

श्री. प्रणिल प्रभाकर कोठारे BE, MBA, CFA, CPA हे नुकतेच फायनान्शियल रिस्क मॅनेजर (F.R.M. conducted by GARP, U.S.A) ची अंतिम परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. अभिनंदन.



कै. लक्ष्मी आणि माधव मोरेश्वर प्रभाकर यांचा नातू, तसेच सौ. चंदा आणि श्री. सुबोध व्ही. गोरक्षकर यांचा नातू श्री. अमेय विनोद प्रभाकर यांनी **बायोटेक्नॉलजी** विषयाची **बी.एस्सी** (मुंबई विद्यापीठ) ही पदवी ८१.८०टक्के मिळवून प्राप्त केली.

एम्.एम्.सी २०११ साठीच्या आयआयटी एन्ट्रन्स परीक्षेला ते बसले. साडेचार हजार विद्यार्थ्यांमधून अखिल भारतात दहाव्या क्रमांकाने ही (JAM 2011-Joint Admission Test for M.sc.2011) परीक्षा उत्तीर्ण झाले. अभिनंदन.

## पाठारे प्रभु चॅरिटीज

संस्थेची 'न्यूजलेटर' पुस्तिका दरवर्षीप्रमाणे घरोघर पोहोचली. नवीन आर्थिक वर्षातील जुलैपर्यंतचा हिशोबही यांत रीतसर नोंदविलेला आहे.


// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### नांदा सौख्यभरे

७-७-११ कु.अपेक्षा प्रशांत राणे श्री.अनुपम आश्विनकुमार तिवारी (आंतरर्ज्ञातीय)

### विवाह सुवर्ण महोत्सव

६-७-११ सौ.सुमालिनी आणि श्री.श्रीपाद काळूराम विजयकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १८-७-११ | सौ.रेखा सुनील धैर्यवान, | वय ६१, | खार |
| १८-७-११ | श्रीम.विमल मनोविहारी तळपदे, | वय ९४, | खार |
| १३-७-११ | श्रीम.नीला रामकृष्ण राणे, | वय ८६, | चौपाटी |
| १३-७-११ | श्रीम.सुनंदा आनंदराव राणे, | वय ८६, | सांताक्रुझ |
| २५-७-११ | श्री.कृष्णकुमार मोतीराम नायक, | वय७८, | ठाकूरद्वार |
| ३०-७-११ | श्री.अरविंद मुकुंद राव, | वय ६४, | ठाणे |
| ३१-७-११ | श्री.मंगेश धुंडीराज कोठारे, | वय ८२, | अंधेरी |
| १-८-११ | श्री. सुदीश (बमन) सुशील कीर्तिकर, | वय ६२, | अंधेरी |
| १-८-११ | श्री.विनायक प्रतापचंद्र नवलकर, | वय ८४, | दादर |
| ९-८-११ | कॅप्टन श्री. जगदीश आर. त्रिलोकेकर | वय७५, | खार |
| ९-८-११ | श्रीमती लक्ष्मी माधव प्रभाकर, | वय८९, | खार |
| ९-८-११ | श्री. सौमित्र आनंदराव अजिंक्य, | वय७४, | खार |

***चुकीची दुरुस्ती***

- 'प्रत्युष' देणगीदारांमध्ये सौ.जान्हवी नील कीर्तिकर असे वाचावे.
- श्री.प्रवीण मानकर यांनी 'प्रत्युष' साठी रु.५०००/-देणगी दिली असे वाचावे.
- श्री.मिलिंद मनोहर सेंजित यांजकडील देणगी दोनदा छापली गेली आहे.
- 'बाळा जो जो रे' मध्ये सौ.नेहा आणि श्री.वैभव प्रकाश धराधर, पुत्र, ऑस्ट्रेलिया, आणि 'आत्याबाई नाव बोला' मध्ये आरित वैभव धराधर असे वाचावे. झालेल्या चुकांबद्दल क्षमस्व.
- 'नांदा सौख्यभरे' मधील श्री. रोहन प्रधान यांच्या विवाहाचा दिनांक २९-५-२०११ असा वाचावा.

## हौशीकला मंदीर-कॅरम स्पर्धा-वर्ष ४थे

रविवार दिनांक २६ जून २०११ रोजी पाठारे प्रभु सांस्कृतिक सभागृहात, हौशीकला मंदीरतर्फे घेण्यात आलेल्या कॅरम स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्या. शनिवारी श्रीमती सरोज प्रधान आणि सौ.योगिता नवलकर यांच्या हस्ते स्पर्धेचे ड्रॉ काढण्यात आले.

श्रीमती स्वाती प्रवीण राणे यांनी कॅरम बोर्डवर प्रथम स्ट्राईक करून स्पर्धा सुरु केली.

श्रीमती वंदना प्रमोद नवलकर यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली.

विजयी स्पर्धकांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

**लेडीज सिंगल्स-**

*प्रथम पारितोषिक*
कु.दिप्ती विजयकर

*द्वितीय पारितोषिक*
सौ.पल्लवी कोठारे

**मेन्स सिंगल्स-**

*प्रथम पारितोषिक*
श्री.अशोक नायक

*द्वितीय पारितोषिक*
श्री.परीश कोठारे

**लेडीज डबल्स**

*प्रथम पारितोषिक*
१)सौ.योगिता नवलकर
२) सौ.ऐश्वर्या तळपदे

*द्वितीय पारितोषिक*
२) सौ.पल्लवी कोठारे
२) सौ.श्वेता राणे.

**मेन्स डबल्स-**

*प्रथम पारितोषिक*
१) श्री परीश कोठारे
२) श्री.उदय तळपदे

*द्वितीय पारितोषिक*
१) श्री.भूषण राणे
२) श्री रश्मीन राणे

**मिक्स डबल्स-**

*प्रथम पारितोषिक*
१) श्री राजन विजयकर
२) कु.दिप्ती विजयकर

*द्वितीय पारितोषिक*
१) श्री.अशोक नायक
२) सौ.योगिता नवलकर

हौशीकला मंदिर संस्थेतर्फे स्पर्धकांना आणि उपस्थित प्रेक्षकांना सकाळी चहा,नास्ता,दुपारी कोंबडीचे मटण व पाव आणि संध्याकाळी चहा व शीतपेय देण्यात आले.